छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक

बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

# मराठवाडा दर्शन

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

Mo.9028349999

E-Mail : marathwadadarshannews@gmail.com

MARATHWADA DARSHAN

संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष -०३ अंक -२५१ बुधवार दि.०३ जुन २०२६ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) DAILY MARATHI Year-03 Issue 251 WEDNESDAY DT.03 JUNE 2026 RNI : MAHMAR/2023/87785 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

प्रतिनिधी पाहिजेत

" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

# शेतक-यांचे एकूण ३६ हजार ५८५ कोटी कर्ज माफ होणार



मुंबई : प्रतिनिधी

३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेण्याचा शब्द सरकारने पाळला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्यातील ५५ लाख ७२ लाख शेतक-यांचे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याच्या प्रस्तावास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

या निर्णयानुसार सरसकट कर्जमाफी होणार नाही तर १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले २ लाखांपर्यंतचे अल्पमुदत पीक कर्ज माफ होणार आहे. सध्या विधानपरिषद निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्याने निवडणूक आयोगाने निर्णय घेण्याची अनुमती दिली, पण हा निर्णय घोषित करता येणार नाही अशी अट आयोगाने घातली होती. या अटीचे आम्ही पालन करत आहोत. त्यामुळे निर्णय घेतला आहे पण घोषित करणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच जाहीर केले होते. मात्र, राज्यात सध्या विधानपरिषद निवडणुकांची प्रक्रिया सुरू असल्याने आचारसंहितेचा फटका या निर्णयाला बसणार की काय, अशी शंका निर्माण झाली होती. खरीप हंगाम तोंडावर असताना थकबाकीदार शेतक-यांना नवीन कर्ज मिळणार की नाही, याबद्दलही शंका होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आयोगाची परवानगी घेण्यात आली आहे. निर्णय घेऊ शकता. मात्र या निर्णयाची घोषणा करता येणार नाही, अशी अट आयोगाने घातली आहे. त्यानुसार राज्य मंत्रिमंडळात कर्जमाफीचा हा निर्णय घेण्यात आला. पण याची सरकारने अधिकृत घोषणा केलेली नाही.

**२ लाखांपर्यंत कर्जमाफी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत राज्यातील ५५. ७२ लाख शेतक-यांना ३६ हजार, ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांना ती लागू असणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत व ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जे यासाठी पात्र ठरणार असून प्रतिशेतकरी जास्तीत जास्त २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात आली.

**जमीन धारणा क्षेत्राचा विचार होणार नाही**

जमीन धारणा क्षेत्राचा विचार केला जाणार नाही. पुनर्गठित-फेरगठित पीक कर्जांनाही लाभ लागू असतील. यापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतक-यांनाही काही अटींसह लाभ देण्यात येणार आहे, असे आज राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आले.

## २४ तासात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडकेबाज कारवाई; ५१ गुन्हे दाखल, ७० आरोपींना अटक

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

पुणे येथे घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू निर्मिती, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष निर्मूलन मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या आदेशानुसार जिल्हाभरात विविध विशेष पथकांमार्फत धडक छापेमारी करण्यात आली.

या २४ तासांच्या विशेष मोहिमेदरम्यान विभागाने मोठी कारवाई करत एकूण ५१ गुन्हे दाखल केले असून ७० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच विभागातील ५ फरार आरोपींचा शोध सुरू असून एका प्रकरणात सुमारे २०,००० किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईत अवैध मद्य उत्पादक आणि विक्रेत्यांचे जाळे उद्ध्वस्त करत मोठ्या प्रमाणात मद्यसाठा आणि रसायने जप्त करण्यात आली. विभागाने १,५७६ बॉक्स लिटर देशी दारू, ४८४ लिटर हातभट्टी/गावठी दारू तसेच सुमारे ४५ लिटर ताडी जप्त केली आहे. याशिवाय मानवी आरोग्यास घातक ठरणारे आणि अवैध दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे ३,०७० लिटर रसायन जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आले.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माहितीनुसार या कारवाईत एकूण ३.५८ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात मद्य, रसायने, वाहने आणि इतर साहित्याचा समावेश आहे.विभागाने स्पष्ट केले आहे की, अवैध मद्य व्यवसायाविरोधातील ही मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असून उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संपूर्ण साखळीवर कारवाई केली जाणार आहे. बेकायदेशीर कृत्यांना कोणतीही मुभा



दिली जाणार नसल्याचे विभागाने सांगितले आहे.अवैध मद्यनिर्मिती, साठवणूक किंवा विक्रीबाबत कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास नागरिकांनी तत्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या हेल्पलाईनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अतिक्रमण हटाव मोहिमेत भेदभाव नको; सर्वांवर समान कारवाई करा – रतन गुजर

बीड /प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी धानोरा रोड परिसरातील अनेक वर्षांपासूनचे अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केल्याबद्दल परिसरातील नागरिक तसेच शिवसेनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. शिवसेना जिल्हा संघटक तथा गुजर समाज देवसेना जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून ही भूमिका मांडली.

निवेदनात म्हटले आहे की, धानोरा रोडवर अनेक वर्षांपासून रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे झाली होती. त्यामुळे वाहतूक, नागरिकांची ये-जा तसेच परिसराच्या विकासात अडथळे निर्माण होत होते. नगरपरिषद प्रशासनाने धाडसी पाऊल उचलून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रतन गुजर यांनी म्हटले की, अनेक व्यापारी लाखो रुपये खर्च करून कायदेशीररित्या दुकाने खरेदी अथवा भाड्याने घेतात. मात्र काही जण सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय करत असल्याने प्रामाणिक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसतो. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याचा निर्णय स्वागतार्ह असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

तथापि, ही मोहीम राबविताना कोणताही भेदभाव होऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. सामान्य नागरिकांची अतिक्रमणे काढून प्रभावशाली व्यक्तींची अतिक्रमणे कायम ठेवली गेली तर प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे कोणाचाही दबाव, वशिला किंवा राजकीय हस्तक्षेप न मानता सरसकट



आणि न्याय्य पद्धतीने सर्व अतिक्रमणांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.नगरपरिषदेने ही मोहीम निष्पक्षपणे राबविल्यास शहराच्या सुशोभीकरणासह वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मोठी मदत होईल, असा विश्वासही रतन गुजर यांनी व्यक्त केला आहे.

## स्वातंत्र्याच्या दशकांनंतरही नांदा एस.टी.पासून वंचित; बससेवेसाठी ग्रामस्थांचा आक्रोश




**कडा-नांदा-मिरजगाव मार्गावर तातडीने एस.टी. सुरू करण्याची परिवहन मंत्र्यांकडे मागणी**

आष्टी (अण्णासाहेब साबळे) - आष्टी तालुक्यातील नांदा गावासह परिसरातील विद्यार्थ्यांची, शेतकऱ्यांची व ग्रामस्थांची गैरसोय दूर करण्यासाठी कडा-निमगाव चोभा-नांदा-फतेवडगाव-कानडी फाटा-वाकी-तिखी-मिरजगाव या मार्गावर तातडीने एस.टी. बससेवा सुरू करावी, अशी मागणी किरण रविंद्र जावळे यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदा गावात आजतागायत नियमित एस.टी. सेवा पोहोचलेली नसल्याने शिक्षण, आरोग्य, शासकीय कामे व बाजारपेठेसाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना दररोज दूरवर प्रवास करावा लागत असून बससेवेअभावी शैक्षणिक नुकसान होत आहे. परिणामी पालकांवर खासगी वाहनांचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

सदर मार्गावर एस.टी. सेवा सुरू झाल्यास हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठी चालना मिळेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नांदा गाव आजही सार्वजनिक वाहतूक सुविधेपासून वंचित असल्याची खंत व्यक्त करत किरण जावळे यांनी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली असून परिसरातील नागरिकांनीही या मागणीला जोरदार पाठिंबा दिला आहे.

## माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार विलास इचके यांची अहिल्यानगर येथील 'फुल मॅरेथॉन'मध्ये यशस्वी घोडदौड!

माजलगाव (प्रतिनिधी):

येथील माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात मागील चार वर्षांपासून कार्यरत असलेले पोलीस अंमलदार विलास प्रल्हाद इचके यांनी आपल्या कर्तव्यासोबतच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांनी ३१ मे २०२६ रोजी अहिल्यानगर (अहमदनगर) येथे संपन्न झालेल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि आव्हानात्मक 'हिस्टोरिक रन - सीजन ५' या स्पर्धेत ४२ किलोमीटरची 'फुल मॅरेथॉन' यशस्वीरीत्या पूर्ण करून पोलीस दलाचा नावलौकिक वाढवला आहे.

पोलीस दलातील अत्यंत व्यस्त आणि जबाबदारीच्या दिनचर्येतून वेळ काढत, केवळ धावण्याच्या (रनिंग) आवडीपोटी विलास इचके यांनी या कठीण स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यांनी ४२ किलोमीटरचे हे अंतर अवघ्या ०४ तास ४८ मिनिटे आणि ०९ सेकंदांत पूर्ण करून फिनिशर सर्टिफिकेट पटकावले. या स्पर्धेचे आयोजन 'अहिल्यानगर सायकलिंग क्लब' आणि 'अहिल्यानगर थलेटिक असोसिएशन' यांच्या वतीने करण्यात आले होते. 'वसुधैव कुटुम्बकम्' या संकल्पनेवर आधारित या मॅरेथॉनला भारतीय सैन्य दल आणि फीट इंडिया यांचेही सहकार्य लाभले होते.

विलास इचके यांच्या या यशाबद्दल माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी पोलीस निरीक्षक देविदास गात, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवळे, सचिन शिंदे पोलीस उपनिरीक्षक, संदीप राठोड पोलीस उपनिरीक्षक, तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी. व अंमलदार स्टाफ, मित्रपरिवार आणि माजलगावच्या क्रीडाप्रेमींकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. खाकी वर्दीतील त्यांच्या या क्रीडा कौशल्यामुळे तरुणांना फिटनेस आणि आरोग्याविषयी एक मोठी प्रेरणा मिळाली आहे

## पाणी पुरवठा वेळेत करुन कामांची गती वाढवा : विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर / सुनील वैद्य ( दैनिक मराठवाडा दर्शन )

छत्रपती संभाजीनगर शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने नवीन पाणीपुरवठा योजनेतील कामांच्या सद्यस्थितीचा आढावा घेत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. तसेच शहराला वेळेत पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी उर्वरित आवश्यक कामे जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, अपर आयुक्त (विकास व




नियोजन) सुषमा देसाई, सहआयुक्त देविदास टेकाळे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सबंधित कंपनीला दिले आहेत. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पाणीपुरवठा योजनेच्या कामाची वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करून पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करण्याबाबत विविध सूचना संबंधितांना दिल्या.

नक्षत्रवाडी जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पाणी प्रक्रिया केंद्र, एरिएशन, क्लोरिनेशन व फिल्ट्रेशन प्रकल्पांची पाहणी यावेळी करण्यात आली. शहरातील पाणीपुरवठा योजनेची उर्वरित कामे संबंधित कंत्राटदार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिका यांनी समन्वयाने व तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

तसेच, या कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दररोज देखरेख ठेवून प्रगती अहवाल सादर करावेत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या आहे .



# पुरवठा विभागाची धडाकेबाज कारवाई

## कोल्हापूर महाकाली मंदिर परिसरात चालणारा अवैध गॅस रिफिलिंगचा अड्डा उद्ध्वस्त : ३९ हजारचा मुद्देमाल जप्त

कोल्हापूर / प्रतिनिधी

कोल्हापूर : शहरातील अत्यंत गजबजलेल्या शिवाजी पेठ, महाकाली मंदिर परिसरामध्ये घरगुती गॅस सिलिंडरमधून व्यावसायिक ऑटो रिक्षांमध्ये अत्यंत धोकादायक पद्धतीने गॅस रिफिलिंग करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा जिल्हा पुरवठा विभागाने पर्दाफाश केला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांच्या थेट मार्गदर्शनाखाली सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी लक्ष्मण माने यांच्या पथकाने १ जून रोजी सायंकाळी छापा टाकला. या कारवाईत गॅस भरण्याच्या मोटारी, सिलिंडर्स आणि डिजिटल क्यूआर कोडसह सुमारे ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.१ जून रोजी महाकाली मंदिर परिसरात एका ऑटो रिक्षामध्ये बेकायदेशीरपणे गॅस भरला जात असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती मिळाली. माहिती मिळताच जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वात तयार करून घटनास्थळी धाड टाकली.पथकाने तात्काळ बाजूलाच असलेल्या एका कौलारू घराची झाडाझडती घेतली असता, तिथे हे बेकायदेशीर आणि जीवघेणे रॅकेट राजरोसपणे सुरू असल्याचे उघड झाले. घटनास्थळावरून राजेंद्र चंद्रकांत मस्के (वय ४८, रा. लक्षतीर्थ वसाहत) आणि स्वप्निल शिंदे (वय १८ वर्ष) यांना ताब्यात घेण्यात आले असून, विनापरवाना व्यवसाय केल्याप्रकरणी त्यांच्यावर भारतीय नागरी सुरक्षा संहिता (इछड २०२३) कलम २८७ आणि जीवनावश्यक वस्तू कायदा (१९५५) कलम ३ व ७ अन्वये कडक कायदेशीर गुन्हा जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्हा आणि शहरात कुठेही अशा प्रकारे अवैध गॅस रिफिलिंग, काळाबाजार किंवा जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी सुरू असेल, तर पुरवठा विभाग त्यावर यापुढेही अशीच कठोर आणि दंडात्मक कारवाई करेल. नागरिकांनीही अशा बेकायदेशीर कृत्यांची माहिती प्रशासनाला देऊन सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांनी केले.या छाप्यात गॅस माफियांकडून ऑनलाईन पेमेंट घेण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञानही जप्त करण्यात आले आहे. तसेच २ क्ष्झ क्षमतेच्या इलेक्ट्रिक मोटारीः २ नग (किंमत रु. २०,०००), क्ष्झउड गॅस सिलिंडर्सः ३ रिकामे व २ भरलेले (किंमत रु. ११,५००), तोशिबा इलेक्ट्रिक वजनकाटा व वजनमापः किंमत रु. ५,२००,डिजिटल पेमेंट साहित्य (झर्ीं स्कॅनर व टठ कोड बोर्ड): किंमत रु. ६००, नोझल, पाईप आणि ५ मीटर केबल बोर्डः किंमत रु. १,५०० असे एकूण जप्त किंमतः ३८,८००/- रुपयेपुरवठा निरीक्षक महेश काटकर, नम्रता कुडाळकर, तुषार पाटील, अभिजित खोत, लिपिक विपुल पाटील, जयवंत गोते, सुशीलकुमार खोंद्रे व पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल पाटील यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# वेरूळ फाटा ते आखतवाडा रस्त्याची दुरावस्था वेरूळ फाटा ते आखतवाडा रोडवर जीवघेणे खड्डे; वाहनधारक त्रस्त

खुलताबाद : प्रतिनिधी

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ फाटा ते आखातवाडा रोडवर ठीक ठिकाणी खड्डे पडले असून ते वाहन धारकांसाठी जीवघेणे ठरत आहे. परिणामी परिसरातील वाहनधारक त्रस्त झाले असून या जीवघेण्या खड्ड्यावर उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. . वेरूळजवळ आखतवाडा हे गाव म्हैसमाळ डोंगराच्या पायथ्याशी आहे. आखत वाडा आखतवाडा तांडा, पळसवाडी तांडा चिंचोली अर्जमपुर पळसगाव निरगुडी पिंपरी तिसगाव तिसगाव तांडा आदी वाडी वस्ती वरील परिसरातील शेतकरी घृष्णेश्वर मंदीर वेरूळ खुलताबाद छत्रपतीसंभाजीनगर येथे शेतीमालाची विक्रीसाठी येत असल्याने या ठिकाणी शेतमालाचे व्यापारी मोठ्या प्रमाणात आहे. शिवाय आठवड्यातून वेरूळ

खुलताबाद येथे आठवडी बाजारसाठी दोन दिवस या ठिकाणी भाजी मंडई भरत असल्याने परिसरातील भाजी उत्पादक या ठिकाणी येतात. याशिवाय दैनंदिन गरजेच्या

वस्तूंसह शेतमालासाठी अत्यावश्यक असणारी औषधी, कीटकनाशके व खतांसाठी खुलताबाद व वेरूळ ही दोन गावे अत्यंत उपयोगी मानल्या जाते. याशिवाय परिसरातील ५ ते ७ गावांसाठी घृष्णेश्वर मंदीर वेरूळ तहसील कार्यालय खुलताबाद. येथे शाळा, महाविद्यालय व दवाखाने असल्याने रुग्णांसह विद्यार्थी व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. विशेष म्हणजे वेरूळ व




खुलताबाद परिसर मंदीर व पर्यटनस्थळ होत असल्याने येथे दररोज कामगारांची सुद्धा ये-जा असते. कामगारांसह मालाची ये-जा करणारी मालवाहू वाहने सुद्धा या रस्त्यावरून रात्रंदिवस धावतात.

मात्र आखतवाडा ते वेरूळ फाटा या सुमारे चार किलोमीटर रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहे. त्यामुळे या रस्त्यावर दररोज लहान मोठे अपघात होतात.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे : जनतेच्या मनात आजही जिवंत असलेले नेतृत्व

**प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड**



महाराष्ट्राच्या राजकारणात जनसामान्यांशी घट्ट नाते जोडणारे, संघर्षातून नेतृत्व घडविणारे आणि लाखो कार्यकर्त्यांच्या हृदयात स्थान मिळविणारे नेते म्हणून लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे नाव आदराने घेतले जाते. ३ जून हा त्यांचा स्मृतिदिन. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा आढावा घेणे म्हणजे एका लोकाभिमुख नेत्याला अभिवादन करण्यासारखे आहे.

बालपण आणि शिक्षण :

माननीय गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांचा जन्म १२ डिसेंबर १९४९ रोजी महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील नाथरा येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण भागातील साध्या वातावरणात त्यांचे बालपण गेले. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित झाले आणि विद्यार्थी चळवळींतून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला.

राजकीय प्रवास :

गोपीनाथ मुंडे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमार्फत आपली राजकीय कारकीर्द सुरू केली. पुढे भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेनंतर त्यांनी महाराष्ट्रात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले. ग्रामीण भागात भाजपची मुळे रुजविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांची ओळख प्रभावी संघटक आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी सतत संपर्क ठेवणारा नेता अशी निर्माण झाली.

१९९५ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आल्यानंतर ते राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री झाले. या काळात त्यांनी प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे, कायदा व सुव्यवस्था मजबूत करणे आणि जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देणे यासाठी प्रयत्न केले.जनतेचा नेता :

गोपीनाथ मुंडे यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा व्यापक जनसंपर्क. शेतकरी, कामगार, मागासवर्गीय समाज, ग्रामीण युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या त्यांनी सातत्याने मांडल्या. त्यामुळे त्यांना लोकनेते ही ओळख मिळाली. त्यांची भाषणे साधी, सरळ आणि जनतेच्या भाषेत असत. त्यामुळे लोकांशी त्यांचे भावनिक नाते निर्माण झाले होते.

राष्ट्रीय राजकारणातील योगदान :

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ते बीड मतदारसंघातून निवडून आले. केंद्रात सरकार स्थापन झाल्यानंतर त्यांना ग्रामीण विकास, पंचायतराज आणि पेयजल विभागाचे केंद्रीय मंत्रीपद देण्यात आले. ग्रामीण भारताच्या विकासासाठी अनेक योजना राबविण्याची त्यांची इच्छा होती. मात्र नियतीला काही वेगळेच मंजूर होते.



# कैलास अहिरे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी निवड

न्याहळोदुधुळे तालुक्यातील न्याहळोद येथील नामांकित पहे लवान श्री.कैलास अहिरे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी नुकतीच निवड झाली असून ते सध्या मा.मुख्यमंत्री साहेबांकडे कार्यरत आहेत. म्हणून आदिवासी विकास संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मोतीलाल सोनवणे व इतर पदाधिकारी ज्ञानेश्वर पाटील, धनराज खैरनार,शिवाजी पाटील, प्राचार्य किरणकुमार चव्हाण,रवी पाटील,दर्यवसिंग गिरासे,गणेश पाटील सर,मनोहर भारती, मधुकर वाघ,अशोक सूर्यवंशी, पिंटू अहिरे,यांनी त्यांच्या सत्कार केला.

या जगात कैलास अहिरे सारखी काही माणसे जन्माला येतात ते विजयाच्या व कर्तुत्वाच्या झेंडा हाती घेऊनच.जीवनाचं सोनं करण्यासाठी,स्वतःचा जन्माच सार्थक करण्यासाठी,आपल्या उद्धारासाठी आणि पर्यायाने जनतेच्या उद्धारासाठी त्यांचा जन्म होत असतो आणि ते विजयाची साक्ष देणारे स्तंभ होतात.जनतेचे आधारस्तंभ होतात.जन्म येणे देवा हाती

# पाणी पुरवठा वेळेत होण्यासाठी कामांची गती वाढवा : विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने नवीन पाणीपुरवठा योजनेतील कामांच्या सद्यस्थितीचा आढावा घेत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. तसेच शहराला वेळेत पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी उर्वरित आवश्यक कामे जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, अपर आयुक्त (विकास व नियोजन) सुषमा देसाई, सहआयुक्त देविदास टेकाळे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन



प्राधिकरण आणि संबंधित कंपनीला दिले आहेत. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पाणीपुरवठा योजनेच्या कामाची वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करून पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करण्याबाबत विविध सूचना संबंधितांना दिल्या.

नक्षत्रवाडी जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्धीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, पाणी प्रक्रिया केंद्र, एरिएशन, क्लोरिनेशन व फिल्ट्रेशन प्रकल्पांची पाहणी यावेळी करण्यात आली. शहरातील पाणीपुरवठा योजनेची उर्वरित कामे संबंधित कंत्राटदार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महानगरपालिका यांनी समन्वयाने व तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.तसेच, या कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दररोज देखरेख ठेवून प्रगती अहवाल सादर करावेत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या आहे .

# मराठवाडा साहित्य परिषदेचा ‘एक दिवस मराठीचा’ कार्यक्रम संपन्न

माजलगाव : (प्रतिनिधी) येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने सोमवारी (दि. २) २९६ वा ’ एक दिवस मराठीचा ’ हा कार्यक्रम संपन्न झाला . यामध्ये कवी उत्तम आवचार यांनी 'मी आणि माझी कविता' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापचे कार्यवाह किशोर गुंजकर होते.

यावेळी बोलताना कवी उत्तम आवचार म्हणाले की, मी शालेय जीवनापासून कविता लिहायला सुरुवात केली. माझ्या गावामध्ये जे वातावरण होतं, त्याचं मी बारकाईने निरीक्षण करू लागलो. हा सर्व निसर्ग मी माझ्या कवितेत मांडला. मी लिहिलेल्या कविता माझ्या शिक्षकांना दाखवत असे. त्यांनी मला कविता लिहिण्यासाठी




प्रोत्साहन दिले. यावेळी त्यांनी

संसार हा रंगमंच
सर्व सदस्य हे नट
सावली वटवृक्षाची
आई वडिलांची दाट

ही कविता सादर केली. त्यानंतर त्यांनी

माणसाच्या प्रवृत्तीला
अवगुणाची फोडणी
समाजभान ठेवून
जन्मजातच आळणी

ही कविता सादर केली. या व्यतिरिक्त त्यांनी प्रेमळ नातं ही कविता सादर केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप किशोर गुंजकर यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालासाहेब झोडगे यांनी केले. सूत्रसंचालन शरद रांजवण यांनी केले तर आभार मोहन राठोड यांनी मानले. यावेळी भगवान धरपडे, खेलबा काळे, उमेश आगे, स्वानंद फपाळ यांच्यासह साहिप्रेमींची उपस्थिती होती.

# २५ वर्षे अपघातमुक्त सेवेसाठी एसटी चालक अरुण गिरी यांचा गौरव

## परळी आगारातून निवड झालेले एकमेव चालक

परळी / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त २५ वर्षे विनाअपघात सेवा बजावल्याबद्दल गाढे पिंपळगावचे सुपुत्र तथा एसटी बस चालक अरुण नारायण गिरी यांचा बीड विभागात विशेष सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, या गौरवासाठी परळी आगारातून निवड झालेले ते एकमेव चालक ठरले आहेत.

कर्तव्यनिष्ठा, संयम आणि सुरक्षित प्रवासी सेवेचा आदर्श जपत अरुण गिरी यांनी सलग २५ वर्षे अपघातमुक्त सेवा बजावली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महामंडळाच्या वतीने त्यांना गौरवचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळयात विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत गिरी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सुरक्षित वाहनचालन कौशल्यामुळे आणि सेवाभावी वृत्तीमुळे ते एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

गाढे पिंपळगाव गावासाठी हा




सन्मान अभिमानाची बाब ठरली असून, परळी आगारातून एकमेव चालक म्हणून झालेल्या त्यांच्या निवडीमुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुक्या प्राण्यांच्या वेदना जाणणारे संवेदनशील पशुवैद्यकीय चिकित्सक: डॉ. संजय नाकलगावकर

माजलगाव : (प्रतिनिधी) माणसाला आपल्या वेदना शब्दांत मांडता येतात, पण ज्यांना वाचा नाही, त्या मुक्या जनावरांच्या वेदना ओळखण्यासाठी केवळ पदवी नाही, तर संवेदनशील मनाची गरज असते. हेच ब्रीदवाक्य जपत बीड जिल्ह्यातील नाखलगावचे सुपुत्र डॉ. संजय नाकलगावकर हे पशुवैद्यकीय क्षेत्रात एक आशेचा किरण ठरत आहेत. परिसरातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी ते केवळ एक डॉक्टर नसून, त्यांच्या पशुधनाचे रक्षक म्हणून ओळखले जातात.

पशुधनाची अहोरात्र सेवा

माजलगाव तालुका हा प्रामुख्याने शेती आणि पशुपालनावर अवलंबून असलेला भाग आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याचे पशुधन संकटात सापडते, तेव्हा डॉ.संजय नाकलगावकर धावून जातात. गायी, म्हशींमधील क्लिष्ट आजार, दुग्धव्यवसायातील अडचणी आणि शेळ्या-मेंढ्यांचे आजार यांवर अचूक निदान आणि उपचार करण्यात त्यांचा हातखंडा आहे. रात्री-अपरात्री येणाऱ्या आपत्कालीन कॉल्सना प्रतिसाद देत, दुर्गम भागात जाऊन प्राण्यांवर उपचार करण्याचे त्यांचे सातत्य कौतुकास्पद आहे.


व्यावसायिक मार्गदर्शनातून रोजगाराच्या संधी

केवळ आजारांवर उपचार करण्यापुरते मर्यादित न राहता, डॉ.संजय नाकलगावकर यांनी ग्रामीण भागातील तरुणांना आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. बीड येथे त्यांनी 'निमल हेल्थ ट्रेनिंग अँड कन्सलटन्सी सर्व्हिसेस' ची स्थापना केली आहे.

या माध्यमातून ते आधुनिक शेळीपालन, कुक्कुटपालन आणि दुग्धव्यवसाय यांविषयी शास्त्रोक्त प्रशिक्षण आणि प्रकल्प अहवाल तयार करून देत आहेत. व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून पशुपालन कसे करावे, याचे अचूक मार्गदर्शन त्यांच्याकडून मिळत असल्याने अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण या व्यवसायाकडे वळत आहेत.

सामाजिक कार्यातही आघाडीवर

डॉ.संजय नाकलगावकर हे केवळ त्यांच्या वैद्यकीय पेशापुरते मर्यादित नसून, सामाजिक कार्यातही ते नेहमी सक्रिय असतात. स्थानिक पातळीवर सामाजिक उपक्रम राबवणे, रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मदत करणे आणि शासकीय योजनांची पारदर्शकता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे यासाठी ते



नेहमी प्रयत्नशील असतात. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत व्हावा, ही त्यांची भावना असते.

शेतकऱ्याचे पशुधन वाचवणे म्हणजेच त्याचे कुटुंब सावरणे होय. मुक्या प्राण्यांची सेवा करताना मिळणारे समाधान हे कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे आहे. आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागातील पशुपालकांना अधिक सक्षम करण्याचा माझा मानस आहे. हा जन्मदिनानिमित्त सकल्प केला आहे


- डॉ. संजय नाकलगावकर (पशुवैद्यकीय चिकित्सक,माजलगाव,बीड)

# मा.सिद्धार्थ तलवारे - अनुसुचित- जातीचे उपवर्गीकरण संदर्भात बैठक

परळी ( प्रतिनिधि)

राज्यात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी विविध संघटनांनी ५८ जातीच्या संघटनेने एकत्र येऊन याबाबत आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. तरी या संदर्भात रिपब्लिकन सन्मान सभेचे महाराष्ट्र राज्य सल्लागार - मा. सिद्धार्थ तलवारे यांनी राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची आणि सदस्याची बैठक तातडीने बोलावण्यात आली आहे.

नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे अनुसूचित जाती एकता समितीच्या वतीने बैठक घेण्यात आली त्या बैठकीत राज्यव्यापी उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड जिल्ह्या पासून ते आझाद मैदानापर्यंत रॅली काढण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्यातील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड जिल्ह्यातून रॅलीची सुरुवात करण्यात येणार आहे. बीड जिल्हा मांजरसुंबा पाटोदा पुणे पनवेल आणि आझाद मैदान येथील रॅली या मार्गाने जाईल जाईल असे स्वरूप स्पष्ट बैठकीत जाहीर करण्यात आले. राज्यात अनुसूचित जातीत ५९ जातींचा समावेश असून ५८ जातीच्यानी एकत्र येऊन राज्यात अनुसूचित जातीत उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, कर्मचारी संघटना, आंबेडकरी संघटना युवक प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या संदर्भात



रिपब्लिकन सन्मान सभेची राज्यस्तरीय अनुसूचित जातींच्या बाबतींत बैठक आयोजित करण्यात आली असून राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी चर्चा करून येणाऱ्या २६ जून रोजी आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनास सहभागी करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती च्या एकूण ५८ जातीच्या समूहाने उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी जिल्हा बीड जिल्ह्यातून १० जून निघणार ते २६ जून ला मुंबईच्या आझाद मैदानावर दखल होणार आहे.

या संदर्भात रिपब्लिकन सन्मान सभेचे राज्य सल्लागार. मा. सिद्धार्थ तलवारे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय कार्यकारणी सदस्याची बैठक आणि राज्यसतरीय बैठक गुरुवार ४ जून रोजी संध्याकाळी ठिक सकाळी ११ वाजता विश्राम गृहसंगमनेर तालुका जिल्हा अहिल्यानगर बोलवण्यात आली आहे. या बैठकीस राज्यातून पदाधिकाऱ्यांनी उपस्थितीत राहावे, असे रिपब्लिकन सन्मान सभेचे महाराष्ट्र राज्य सल्लागार - मा. सिद्धार्थ तलवारे यांनी आवाहन केले आहे.

# दोन दिवसांत दुसरी धडक कारवाई; चुकीच्या ब्रँडिंगमुळे ३६ हजारांहून अधिक बाटल्या ताब्यात

छत्रपती संभाजीनगर /सुनिल वैद्य (दैनिक मराठवाडा दर्शन )

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) छत्रपती संभाजीनगर येथे मोठी कारवाई करत करोडी परिसरातील मे. एफडीसी लिमिटेडच्या गोदामातून सुमारे २० लाख ७८ हजार ६७६ रुपयांचे 'एनर्जल' (एछएठन-ङ) पेय जप्त केले. दोन दिवसांत करण्यात आलेली ही दुसरी मोठी कारवाई असून अन्न सुरक्षा विभागाने नियमभंग करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने मंगळवारी (ता. २) करोडी येथील मे. एफडीसी लिमिटेड कंपनीच्या गोदामाची तपासणी केली. यावेळी




'आरटीएस फ्रूट बेव्हरेज एनर्जी अँड इलेक्ट्रोलाइट (एछएठन-ङ)' या पेयाच्या ४०० मिली क्षमतेच्या एकूण ३६ हजार ४६८ बाटल्या साठवून ठेवण्यात आल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान संबंधित उत्पादनाच्या लेबलिंग व ब्रँडिंगमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले.अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण यांच्या पत्रानुसार सदर उत

# २९ वर्षांची निष्ठावंत सेवा पूर्ण; बिबीशन तिडके यांना निरोप समारंभात भावुक वातावरण

माजलगांव (प्रतिनिधी):-श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेत गेली २९ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे श्री बिबीशन गोविंदराव तिडके हे शासनाच्या नियमानुसार सेवेतून निवृत्त झाल्याने त्यांचा संस्थेच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार मा. मोहनराव (काका) सोळंके यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.




यावेळी बोलताना मा. मोहनराव (काका) सोळंके यांनी श्री तिडके व त्यांच्या पत्नीला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत निरोगी, सुखी व समाधानी जीवनाच्या सदिच्छा व्यक्त केल्या. श्री बिबीशन तिडके यांनी आपल्या सेवाकाळात शांत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचारी म्हणून काम केले. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची कार्यपद्धती संस्थेसाठी नेहमीच लाभदायी ठरली. त्यांच्या सेवाकाळात कोणतीही तक्रार न आल्याने त्यांनी संस्थेच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याचे मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना अनेकांना भावनिक क्षणांचा अनुभव आला. संस्थेचे सचिव ॲड. विठ्ठलरावजी (दादा) तिडके यांनी आपल्या लहान बंधू बिबीशन तिडके यांच्या बालपणातील संघर्ष आणि कठीण परिस्थितीची आठवण सांगितली. त्यावेळी त्यांचे डोळे पाणावले आणि उपस्थितांनाही आपल्या भावना आवरता आल्या नाहीत.

तिडके कुटुंबीयांनी आपल्या यशाचे व प्रगतीचे श्रेय श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मोहनराव (काका) सोळंके यांना दिले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी श्री बिबीशन तिडके यांना सेवानिवृत्तीबद्दल शुभेच्छा देऊन त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.यावेळी भाजपा राज्य परिषद सदस्य अरुण राऊत, अर्जुन नाईकनवरे , सत्यनारायण उगवणे, डॉ . अशोक तिडके,बाळासाहेब क्षीरसागर, कल्याण शेप, सुभाष साळवे,अजय सोळंके, नितीन तिडके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# इंडिगो पेंट्स च्या सेवा उत्सवातून ज्ञानदीप विद्यालयाला नवे रूप



## इंडिगो पेंट्सचे विक्रेते श्री.कल्पक चिद्रवार यांचा पुढाकार;ज्ञानदीप विद्यालयाला नवी झळाळी

किल्ले धारूर /अविनाश जगताप

इंडिगो पेंट्सच्या सेवा उत्सव उपक्रमांतर्गत धारूर शहरातील पेंटर बांधवांनी एकत्र येत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाची रंगरंगोटी करून शाळेला आकर्षक व नवे रूप दिले. या सामाजिक उपक्रमाचे शाळा प्रशासनासह पालक व नागरिकांकडून कौतुक होत आहे.

सेवा उत्सव उपक्रमांतर्गत शहरातील पेंटर बांधवांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेत शाळेच्या संपूर्ण इमारतीची रंगरंगोटी केली. विशेष म्हणजे अवघ्या चार ते पाच तासांत हे काम पूर्ण करून त्यांनी समाजापुढे सेवाभावी कार्याचा आदर्श निर्माण केला.या उपक्रमासाठी इंडिगो पेंट्सचे अधिकृत विक्रेते श्रीकृष्णा कलर अँड हार्डवेअर,धारूरचे संचालक श्री. कल्पक चिद्रवार यांनी पुढाकार घेतला. त्यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करून शाळेच्या रंगरंगोटीचे नियोजन केले व त्याची यशस्वी अंमलबजावणी केली.

यावेळी इंडिगो पेंट्सचे विभागीय प्रमुख श्री. गजानन बिरादर, पत्रकार अनिल महाजन, सेल्स मॅनेजर श्री. औदुंबर गाडगे, श्री. सागर गिरी, श्री. सोहेल चाऊस, सचिन चव्हाण विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. विठ्ठल सुरवसे, शिक्षकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक संस्थांना सहकार्य करण्याच्या या उपक्रमामुळे ज्ञानदीप विद्यालयाला नवसंजीवनी मिळाली असून परिसरातील नागरिकांनी इंडिगो पेंट्स व सर्व पेंटर बांधवांचे आभार व्यक्त केले

# २४ तासात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडकेबाज कारवाई; ५१ गुन्हे दाखल, ७० आरोपींना अटक

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

पुणे येथे घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू निर्मिती, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष निर्मूलन मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या आदेशानुसार जिल्हाभरात विविध विशेष पथकांमार्फत धडक छापेमारी करण्यात आली.

या २४ तासांच्या विशेष मोहिमेदरम्यान विभागाने मोठी कारवाई करत एकूण ५१ गुन्हे दाखल केले असून ७० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच विभागातील ५ फरार आरोपींचा शोध सुरू असून एका प्रकरणात सुमारे २०,००० किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईत अवैध मद्य उत्पादक आणि विक्रेत्यांचे जाळे उद्ध्वस्त करत मोठ्या प्रमाणात मद्यसाठा आणि रसायने जप्त करण्यात आली. विभागाने १,५७६ बॉक्स लिटर देशी दारू, ४८४ लिटर हातभट्टी/गावठी दारू तसेच सुमारे ४५ लिटर ताडी जप्त केली आहे. याशिवाय मानवी आरोग्यास घातक ठरणारे आणि अवैध दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे ३,०७० लिटर रसायन जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आले.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माहितीनुसार या कारवाईत एकूण ३.५८ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात मद्य, रसायने, वाहने आणि इतर साहित्याचा समावेश आहे.विभागाने स्पष्ट केले आहे की, अवैध मद्य व्यवसायाविरोधातील ही मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असून उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संपूर्ण साखळीवर कारवाई केली जाणार आहे. बेकायदेशीर कृत्यांना कोणतीही मुभा



दिली जाणार नसल्याचे विभागाने सांगितले आहे.अवैध मद्यनिर्मिती, साठवणूक किंवा विक्रीबाबत कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास नागरिकांनी तत्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या हेल्पलाईनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अतिक्रमण हटाव मोहिमेत भेदभाव नको; सर्वांवर समान कारवाई करा – रतन गुजर

बीड /प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी धानोरा रोड परिसरातील अनेक वर्षांपासूनचे अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केल्याबद्दल परिसरातील नागरिक तसेच शिवसेनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. शिवसेना जिल्हा संघटक तथा गुजर समाज देवसेना जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून ही भूमिका मांडली.

निवेदनात म्हटले आहे की, धानोरा रोडवर अनेक वर्षांपासून रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे झाली होती. त्यामुळे वाहतूक, नागरिकांची ये-जा तसेच परिसराच्या विकासात अडथळे निर्माण होत होते. नगरपरिषद प्रशासनाने धाडसी पाऊल उचलून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रतन गुजर यांनी म्हटले की, अनेक व्यापारी लाखो रुपये खर्च करून कायदेशीररित्या दुकाने खरेदी अथवा भाड्याने घेतात. मात्र काही जण सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय करत असल्याने प्रामाणिक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसतो. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याचा निर्णय स्वागतार्ह असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

तथापि, ही मोहीम राबविताना कोणताही भेदभाव होऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. सामान्य नागरिकांची अतिक्रमणे काढून प्रभावशाली व्यक्तींची अतिक्रमणे कायम ठेवली गेली तर प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे कोणाचाही दबाव, वशिला किंवा राजकीय हस्तक्षेप न मानता सरसकट



आणि न्याय्य पद्धतीने सर्व अतिक्रमणांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.नगरपरिषदेने ही मोहीम निष्पक्षपणे राबविल्यास शहराच्या सुशोभीकरणासह वाहतूक व्यवस्था सुधारण्यास मोठी मदत होईल, असा विश्वासही रतन गुजर यांनी व्यक्त केला आहे.

# आमदार संग्राम जगताप यांच्या 'त्या' जातीयवादी विधानाचा तीव्र निषेध; राष्ट्रवादीने आपल्या आमदाराला लगाम घालावा!

बीड /प्रतिनिधी

अहमदनगरचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांनी काल 'बुरखा हटाव, देश बचाव' असा जो अत्यंत निंदनीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारा प्रपोगंडा सुरू केला आहे, त्याचा मी अत्यंत तीव्र शब्दांत निषेध करतो. राज्याला भेडसावणारे बेरोजगारी आणि महागाई यांसारखे मूलभूत प्रश्न बाजूला ठेवून, केवळ स्वस्त लोकप्रियतेसाठी आणि राजकीय पोळ्या भाजण्यासाठी एका विशिष्ट समाजाला लक्ष्य करण्याचे हे कृत्य अतिशय नीच पातळीवरचे आहे. देशाच्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला आपल्या आवडीनुसार आणि परंपरेनुसार जगण्याचा अधिकार दिला आहे, त्यावर घाला घालण्याचा अधिकार या आमदारांना कोणी दिला ?

सत्तेच्या मस्तीत बेताल बडबड करणाऱ्या आमदार जगताप यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने वेळीच आवरायला हवे. माझी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार आणि पक्षाच्या संपूर्ण वरिष्ठ नेतृत्वाकडे जाहीर मागणी आहे की, त्यांनी या प्रवृत्तीला तातडीने लगाम घालावा. जर या द्वेषपूर्ण आणि बेजबाबदार विधानावर पक्षाने मौन बाळगले, तर हा संपूर्ण विषारी प्रचार पक्षाच्या मूकसंमतीनेच सुरू आहे, हे महाराष्ट्रातील जनतेच्या लक्षात येईल.

समाजात फूट पाडून आपली राजकीय पोळी भाजण्याचा हा प्रयत्न आम्ही कदापि खपवून घेणार नाही.




आमदार जगताप यांनी आपले शब्द त्वरित मागे घेऊन जाहीर माफी मागावी. अन्यथा, या द्वेषपूर्ण राजकारणाविरोधात लोकशाही मार्गाने जशास तसे उत्तर दिले जाईल आणि याविरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# भारतीय बौद्ध महासभा व क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी होणार

माजलगाव (प्रतिनिधी)

सामाजिक परिवर्तन, मानवमुक्ती, शिक्षण प्रसार आणि समाजप्रबोधनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या भारतीय बौद्ध महासभा, माजलगाव आणि क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ जून २०२६ रोजी आरक्षणाचे जनक, बहुजनांचे कैवारी आणि सामाजिक समतेचे महान पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे.



भारतीय बौद्ध महासभा ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत असून समाजामध्ये बौद्ध धम्म, सामाजिक जागृती आणि प्रबोधनाचे कार्य करत आहे. तर क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि युवक विकासाच्या क्षेत्रात विविध उपक्रम राबवून समाजहिताचे कार्य करीत आहे. या दोन्ही संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राजर्षी शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे.

राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. बहुजन समाज शिक्षित, संघटित आणि स्वाभिमानी व्हावा यासाठी त्यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले.

यावर्षीच्या जयंतीनिमित्त भव्य देखावा, आकर्षक मिरवणूक, अभिवादन कार्यक्रम, विचारप्रबोधनपर व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच शाहू-फुले-आंबेडकर विचारांचा जागर करणारे विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. युवकांनी इतिहासाचा अभ्यास करून सामाजिक एकात्मता आणि परिवर्तनाचा संदेश समाजात पोहोचवावा, हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा, माजलगाव आणि क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्या वतीने सर्व समाजबांधवांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे. समाजप्रबोधनाच्या या उपक्रमासाठी आर्थिक योगदानाची आवश्यकता असून प्रत्येकाने किमान १००० रुपये देणगी स्वरूपात सहकार्य करून सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

तसेच सर्व भीमसैनिक, नागरिक, माता-भगिनी, युवक-युवती तसेच शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचे अनुयायी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा, माजलगाव व क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ५८ वर्षांची ज्ञानतपश्चर्या पूर्णत्वास; आदर्श मुख्याध्यापक सोपान काकडे व सुनिल काकडे यांच्या सेवागौरव सोहळ्याने शिक्षणविश्व भारावले

## अनेक विद्यार्थी घडविणारे आदर्श शिक्षक - आ. सुरेश धस

आष्टी (अण्णासाहेब साबळे)

शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ काळ प्रामाणिकपणा, निष्ठा, शिस्त, संस्कार आणि विद्यार्थीकेंद्री कार्याची अखंड परंपरा जपत हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोहिणीचे मुख्याध्यापक श्री. सोपान मुरलीधर काकडे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडीचे मुख्याध्यापक श्री. सुनिल प्रल्हाद काकडे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित भव्य गौरव सोहळा रविवारी दि. ३१ मे २०२६ रोजी मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.

शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने शिक्षण क्षेत्रातील दोन कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्वांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात कृतज्ञता, आदर, प्रेम आणि संस्कारांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार साहेबराव दरेकर होते, तर लोकनेते तथा मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आशीर्वादासाठी ह.भ.प. तुळशीराम महाराज काकडे व ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे यांची उपस्थिती लाभली.



यावेळी मा. जि.प. सदस्य देविदास आबा धस, सतीश आबा शिंदे, युवा नेते अभयराजे धोंडे, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, समाजसेवक विजय गोल्हार, माजी सभापती बद्रीनाथ जगताप, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे, भाऊसाहेब लटपटे, अमोल राजे तरटे, कल्याण काकडे, नवनाथ गाडे, भरत भवर, लक्ष्मण नन्नवरे, उद्योगपती शहादेव वनवे, अशोक पोकळे, बाळासाहेब सपकाळ, हनुमंत शिपलकर, महेश जगताप, जरे साहेब, मनोरंजन धस, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पवार, महेशकुमार शिंदे, अशोक लटपटे, राज्य पुरस्कार प्राप्त पी. वाय. काळे सर, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, पत्रकार सुरज काकडे, लोकशाही पत्रकार संघ जिल्हा उपाध्यक्ष तथा जागतिक लोकवार्ता संपादक, दैनिक लोकनेता सहसंपादक अण्णासाहेब साबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. बेलगाव केंद्राचे केंद्रप्रमुख रघुनाथ खंडागळे यांनी प्रास्ताविकातून दोन्ही सत्कारमूर्तींच्या कार्याचा सविस्तर आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव केला.

यानंतर सोपान मुरलीधर काकडे व सुनिल प्रल्हाद काकडे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, फेटा, पुष्पगुच्छ व उभा पोशाख देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात आला. तसेच स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी इंटरनॅशनल पैलवान शिवा चव्हाण आणि अक्षर कलाकार कार्तिक भवर यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# लोकशाही पत्रकार संघाच्या सुवर्णा रवींद्र दाभाडे

## नाशिक जिल्हा अध्यक्ष पदी यांची नियुक्ती जाहीर

बीड /प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघाच्या विविध ७२ विकास समिती आहेत. या समितीच्या प्रत्येक वेगवेगळ्या समितीवर नियुक्त्या प्रत्येक राज्यात सध्या जाहीर होत आहेत. याच अनुषंगाने सुवर्णा रवींद्र दाभाडे नाशिक जिल्हा अध्यक्ष पदी यांची नियुक्ती जाहीर. लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत वैद्य,राष्ट्रीय अध्यक्षा महिला आघाडी हालिमा शेख,राज्य मार्गदर्शक विजेंद्रजी डूलगच, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव,राष्ट्रीय उपाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख,प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे पाटील, प्रदेश युवा अध्यक्ष किशोर पवार,प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश उपाध्यक्ष उद्योग विकास समिती च्या शुभांगी पाटील,प्रदेश कार्याध्यक्ष अयुब खान पठाण, प्रदेश अध्यक्ष डिजिटल मीडिया रमेश जोगदंड, प्रदेश उपाध्यक्ष डिजिटल मीडिया महेबूब शेख,प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, आजाद शेख,मराठवाडा कायदेशीर सल्लागार अँड श्रीकांत जाधव, पत्रकार तथा प्रवचनकार ह. भ. प. फपाळ महाराज, मराठवाडा सचिव बाजीराव गायकवाड, बीड जिल्हा अध्यक्ष सायं दैनिक बीड सरकार चे संपादक साहस अदोडे,डॉ. दीपक तांगडे, लेक लडकी अभियान चे बाजीराव ढाकणे, डॉ. गजानन वटाणे, यांच्या आदेशानुसार अनिस



कुरेशी प्रदेश उपाध्यक्ष ,बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी, लेडी सिंघम पूजा काळे यांनी लोकशाही पत्रकार संघाच्या सुवर्णा रवींद्र दाभाडे यांची

नाशिक जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती जाहीर केली.लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा मा श्री संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांनी सर्वांच्या उपस्थितीत घोषणा केली. सुवर्णा रवींद्र दाभाडे यांच्या उत्कृष्ट पुढील कार्यासाठी सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या व सर्वांकडून उत्कृष्ट लोकशाही पत्रकार संघाचे कार्य भविष्यात आपण कराल अशी अपेक्षा ही यावेळी उपस्थित मान्यवर यांनी व्यक्त केल्या. सुवर्णा दाभाडे यांच्यावर राज्यातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# आगामी पावसाच्या सुरुवातीला बीड शहरातील सर्व ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवा

## सी ओ साहेब एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे नगरसेवक बीड

बीड /प्रतिनिधी

येणाऱ्या पुढील आठ ते दहा दिवसांपूर्वी बीड शहरातील मान्सून पूर्व नदी नाले साफसफाई मोहीम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावी, तसेच सध्या बीड शहरामध्ये होणारी पाणीटंचाई दूर करण्यात यावी काही ठिकाणी बिन शहरातील असलेली पाईपलाईन लिकेज असलेली पाईपलाईन दुरुस्त करण्यात यावी त्यामधून येणारे पाणी बऱ्याच ठिकाणी फुटलेल्या पाईपलाईन दुरुस्ती, तसेच विद्युत खांबावरील असलेल्या बंद लाईटी तसेच दुरुस्ती बाबत, तसेच कोणताही जातीभेद न करता कोणताही बेल्ट न बघता, मग ग्रीन बेल्ट असो, ऑरेंज बेल्ट, की ब्लू बेल्ट, हिंदू मुस्लिम




बौद्ध सर्व बेल्ट मध्ये जातीपाती न पाहता, सर्व धार्मिक स्थळे, शाळा , व ज्ञान मंदिर या ठिकाणी असलेले बीड शहरातील विकासात्मक सर्व कामे पूर्ण करावीत अशी मागणी बीड नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मा मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड मा श्री शैलेश जी फडसे साहेब नगरपरिषद बीड यांच्याशी सकारात्मक बीड शहरातील सर्व विकासाच्या बाबतीमध्ये चर्चा नगरसेवक एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे यांनी केली ड.गोविंद भैया शिराळे यांच्यासमवेत बीड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिकारी साहेब यांना आपल्या ज्या बीड शहरातील विकासाच्या बाबतीत ज्या मागण्या आहेत त्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या होत्या याची दखल तात्काळ घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जी फडशे साहेब यांनी या महत्त्वाच्या विषयाची दखल घेऊन बलगुजर परिसरातील जिजाऊ नगर, तिरुपती नगर, शिवाजीनगर, स्वराज्य नगर, खोल वाट, शिराळे नगर, सावता नगर, धांडे नगर, राजमुद्रा नगर, सोमेश्वर नगर या सर्व परिसरात आज नगरपरिषद प्रशासनाने स्वच्छता मोहीम सुरू केली असून बीड नगरपरिषद कर्तव्यदक्ष चे मुख्य धिकारी शैलेश फडसे साहेब यांचे आभार व्यक्त केले यावेळी नगरसेवक एडवोकेट गोविंद शिराळे, व सहकारी नगरसेवक नंदकिशोर पिंगळे व समस्त भागातील नागरिक मोठ्या संख्येने दिसून आले

# योगेश्वरी महाविद्यालयाच्या डॉ. श्वेता कांबळे यांना प्राणीशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

अंबाजोगाई/ प्रतिनिधी : उमेश शिंदे

अंबाजोगाई : योगेश्वरी महाविद्यालय , अंबाजोगाई येथील प्राणीशास्त्र विभागाच्या संशोधिका डॉ. श्वेता गौतम कांबळे यांनी इंपॅक्ट ऑफ हेवी मेटल्स ऑन डायवर्सीटी, रिप्रोडक्शन न्ड सम फिजीयॉलॉजीकल अस्पेक्टस् ऑफ फ्रेशवॉटर मझल्स फ्रॉम लार्ज डॅम्स ऑफ बीड डिस्ट्रीक्ट या विषयावर संशोधन प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , छत्रपती संभाजीनगर येथे सादर केला. त्यांच्या पीएच.डी.पदवीसाठी खुली मौखिक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पडली. परीक्षेदरम्यान डॉ. श्वेता यांनी आपल्या संशोधन कार्याचे प्रभावीपणे सादरीकरण केले तसेच परीक्षकांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. परीक्षक समितीने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केल्याची घोषणा केली.



यासाठी त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ.जी.डी. सूर्यवंशी , प्राध्यापक व विभागप्रमुख, प्राणीशास्त्र विभाग , योगेश्वरी महाविद्यालय , अंबाजोगाई यांनी मार्गदर्शन केले. ' बीड जिल्ह्यातील मोठ्या धरणांमधील गोड्या पाण्यातील शिंपल्यांवर जड धातूंच्या परिणामांचा अभ्यास ' करणारे हे संशोधन पर्यावरण संरक्षण , जलस्रोत व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

या यशाबद्दल डॉ. श्वेता कांबळे यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम व्हि. कानेटकर व मार्गदर्शक डॉ गणेश सुर्यवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल सामाजिक क्षेत्रातील ड शाम तांगडे , ड. संदीप थोरात , डॉ किर्तीराज लोणारे , संजय हतागळे , विश्वनाथ सावंत , मुरलीधर कांबळे , बलभीम बनसोडे , मिलिंद कांबळे , नरसिंग तरकसे आदी मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.


# जेईई डव्हान्स परीक्षेत सत्यम शिनगारे यांची कौतुकास्पद कामगिरी

किल्ले धारूर/प्रतिनिधी

किल्ले धारूर येथील सत्यम सुरेश शिनगारे यांनी देशातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या जेईई डव्हान्स (गएए -वींरपलशव) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे किल्ले धारूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जेईई डव्हान्स ही भारतीय तंत्रज्ञान संस्था (खखढ) मध्ये प्रवेशासाठी घेतली जाणारी अत्यंत स्पर्धात्मक परीक्षा असून दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेची तयारी करतात. अशा कठीण परीक्षेत सत्यम यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची जिद्द, कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि पालक व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

सत्यम यांच्या या यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सत्यम यांचे यश प्रेरणादायी असून मेहनत, चिकाटी आणि योग्य नियोजनाच्या बळावर मोठे यश मिळविता येते, हे त्यांनी



आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे.

सत्यम सुरेश शिनगारे यांचे या उल्लेखनीय यशाबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा

# नाशिक मध्ये देवचंद्र फॉउंडेशन कडून राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

महाराष्ट्र तसेच नाशिक मध्ये नेहेमी आपल्या सामाजिक कार्यात ठसा उमटवणारे देवचंद्र फॉउंडेशन यांच्या तर्फे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन देवचंद्र फॉउंडेशन चे सौ देवयानी आहेर, जयश्री ताई बस्ते, गणेश जगदाळे यांच्या तर्फे नाशिक मधील कॉलेज रोड येथील गुरुदक्षिणा हॉल या ठिकाणी करण्यात आला होता..

यावेळी कार्यक्रमाच्या सुरवातीला दीप प्रज्वल न करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोनी पैठणीचे संचालक संजय सोनी,




आडगावकर ज्वेलर्स संचालक सागर आडगावकर, मिलिंद तारे, मास्टर झेन, डॉ आशाताई पाटील, रुपाली पवार, डॉ किरण पाटोळे, नेत्रा कदम, अर्चना कुर्विनकोप, डॉ आशाताई देवळेकर, श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी डॉ राखी ताई नंदगिरी, श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी डॉ वैभवी ताई पाटील, श्री योगेश गांगुर्डे, धनश्री गायधनी, डॉ चेतना सेवक, आशा मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले...

यावेळी पुरस्कार्थी हर्षलाताई भोसले, सागर निकाळे, मुजाहीद मोहिनोद्दीन फारुकी अशीर्फी, शाम जाधव, संदिप काकड, किरण ताई शिंपी, विकास घाटोळ, गायत्री सोनगीर, आदिती लिटे, पूनमताई मढे, प्रशांत शेळके, सुवर्णा ताई दाभाडे, मीराताई आवारे, तुषारदादा गांगुर्डे, कल्पना भावसार, कविताई गायखे, पुनम आहिरे, कल्पना भावसार,मिरा ताई डावरे, आशाताई भवर, भागवत वैद्य, अनिश कुरेशी, सिद्धार्थ नेतने,कैलास चौधरी, कुणाल जगताप, सुमित सातपुते, सुधाकर तुपे, धर्मेंद्र कदम या सर्वांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.. व पुढील भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

माणूस स्वतः च्या सुखाने एवढा सुखी होत नाही जेवढा दुसऱ्याच्या दुःखाने होतो असं गुरुजी म्हणाले.

माणूस स्वतः च्या सुखाने एवढा सुखी होत नाही जेवढा दुसऱ्याच्या दुःखाने होतो असं गुरुजी म्हणाले.. हें ज्यांना लागू होतं ती माणसं भित्री असतात. त्यांच्याकडे आत्मविश्वासाचा अभाव असल्यामुळे ते इतरांच्या सुखाने सुखी होण्यापेक्षा असुरक्षित वाटून घेतात आणि इतरांच्या दुःखाने मात्र सुखावतात. मी तर असेही लोक पाहिले जे स्वतः सर्वार्थाने सुखी असून सुद्धा इतरांच्या सुखाने बेजार होतात. ही कलियुगाची शोकांतिका आहे. किंबहुना खरे सुख काय हें आज कोणी विरळा जाणतो. अगोदर असे अनुभव आल्यास थोडे विचलन होत असे. मात्र गुरुजींच्या कृपेने अलीकडे या गोष्टी अति सामान्य भासतात त्यामुळे स्वस्थपणे पाहता येते अन उलट अशा प्रकारे इतरांच्या दुःखाने सुखी होणाऱ्यांची कीव येते.थँक्स गुरुजी फार कृपा आपली. आपला नित्य जयजयकार असो.

# भगवद्गीतेच्या पूजनाने 'अपना परिवार' प्रशिक्षण शिबिराची प्रेरणादायी सुरुवात; ग्रंथ भेट देऊन पत्रकार अण्णासाहेब साबळे यांचा गौरव

## अध्यात्म, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबनाचा प्रभावी संदेश; आष्टीतील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

आष्टी (अण्णासाहेब साबळे)

ध्येय, जिद्द, सकारात्मक विचार आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यशस्वी जीवनाची वाटचाल कशी घडवावी, याचे मार्गदर्शन करणारे 'अपना परिवार' एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर आष्टी येथील भैरवनाथ लॉन्स, खडकत रोड येथे उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. अध्यात्म, मानसिक विकास, व्यक्तिमत्त्व घडण, आर्थिक स्वावलंबन आणि कुटुंबातील सुसंवाद यांसारख्या जीवनाला दिशा देणाऱ्या विषयांवर झालेल्या मार्गदर्शनामुळे शिबिराला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात आमदार बाळासाहेब आजबे यांचे चिरंजीव यश बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते श्रीमद् भगवद्गीता पूजन व ग्रंथ हस्ते धारण करून करण्यात आली. ज्ञान, संस्कार आणि अध्यात्म यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा क्षण उपस्थितांसाठी विशेष प्रेरणादायी ठरला.

शिबिरात महागुरूजी सुनील परदेशी, गुरुमाता संगीता परदेशी, डॉ. कुणाल परदेशी आणि अक्षय परदेशी यांनी जीवन जगण्याची कला या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत आधुनिक जीवनातील विविध आव्हानांवर प्रकाश टाकला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास (आबा) धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

आजची तरुण पिढी शिक्षणाचा योग्य वापर का करू शकत नाही, विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येच्या घटना का वाढत आहेत, पालक आणि मुलांमधील संवादाचा अभाव, आर्थिक स्वावलंबनातील अडथळे तसेच समाजातील समन्वय कमी होण्यामागील कारणे यांचे सखोल विश्लेषण करून उपस्थितांना सकारात्मक विचारांची दिशा देण्यात आली. जीवनातील संकटांना धैर्याने सामोरे जाणे, कुटुंबातील नातेसंबंध दृढ करणे, आत्मविश्वास वाढविणे आणि समाजहिताची जाणीव जागृत ठेवणे याबाबतही मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कांतीलाल परदेशी, रोशनी पाटील, कीर्ती बचाव, पुष्पा चौधरी, महादेव लोमटे, भीमराव पवार, महारुद्र बळे, सावळेराम बळे, शांतिनाथ धस, सुरेश पवार (माजी शिक्षण विस्तार अधिकारी), राजू बोराडे, बापूकाका मोकाशे, विजू गावडे, विठ्ठल खाडे, मुकेश गोसावी, दिगंबर सर (जालना), समाधान सर, रमेश बैरागी, वैशाली पाटील (धुळे), नयना पाटील, प्रतीक्षा वाणी, स्वामिनी पारखे, तेजस्विनी वाणी, विमल महारुद्र बळे, पांडुरंग बळे, महादेव कांगळे,नानासाहेब तवले, संजय बळे,निर्मला शोले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जागतिक लोकवार्ता संपादक आणि दैनिक लोकनेता सहसंपादक अण्णासाहेब साबळे यांचा फेटा, हार,



पुष्पगुच्छ तसेच ग्रंथ भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि जनजागृती क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला.

कार्यक्रमास सेफ शॉप परिवारातील सदस्य, विविध क्षेत्रांतील मान्यवर, महिला, युवक-युवती तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रेरणादायी विचार, सकारात्मक ऊर्जा आणि कुटुंबवत्सल वातावरणामुळे हे प्रशिक्षण शिबिर उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी छाप उमटविणारे ठरले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सावळेराम (आबा) बळे यांनी प्रभावीपणे पार पाडले.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PUBLISHED BY **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** ON BEHALF OF **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB** AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED **( MAHARSHTRA )**.
EDITOR- **HANDIBAG DATTATRAY BALASAHEB**